# 6. किसिवालस्स जीवणं



वर्तमानकालीन शेतकऱ्यांचे जीवन दिवसेंदिवस संकटग्रस्त आणि दु:खदायक होत आहे. शेती व्यवसाय न परवडणारा होत आहे. त्यामुळे निराश झालेला शेतकरी आत्महत्येकडे वळत आहे हे अत्यंत दु:खदायक आहे.

प्राकृत साहित्यातील शेतकरी मात्र संकटास न घाबरता मोठ्या धैर्याने संकटावर मात करत असलेला दिसून येतो,परंतु आत्महत्येचा अवलंब करत नाही. उलट जमीन कितीही कठीण, खडबडीत असली तरीही नांगर धरणाऱ्याच्या हातात शक्ती असेल तर खडबडीत जमीनही सुपीक होते. या विचारांचेच शेतकरी गाथासप्तशती ग्रंथात आढळतात, परंतु आत्महत्या केल्याचे एकही उदाहरण दिसत नाही.

तेव्हा आजच्या शेतकऱ्याने गाथा सप्तशतीमधील शेतकऱ्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून धैर्याने शेती केल्यास नैराश्य येणार नाही. तसेच आत्महत्या केल्याने संकट तर टळत नाही उलट ते वाढते. हे लक्षात घेऊन शेतकऱ्याने आत्महत्येचा मार्ग सोडून धैर्याने शेती करावी असा या पाठाचा उद्देश आहे. सदर गाथा ह्या हालकवींनी लिहिलेल्या 'गाथासप्तशती' या प्राकृत ग्रंथातून घेतल्या आहेत.

1. पंक-मइलेण, छीरेक्क-पाइणा दिण्ण-जाणु-वडणेण ।
   आणंदिज्जइ हलिओ पुत्तेण व्व सालि-छेत्तेण ।।567।।

2. फलही-वाहणं पुण्णाह-मंगलं लंगले कुणंतीए ।
   सईअ मणोरह-गब्भिणीअ हत्था थरहरन्ति ।।165।।

3. कढिण-खरवीर-पेल्लण-हल व्व पत्थर-विणिग्गय-अग्गिकणे
   धचलो-आयरिय-पहे कस्स वि सुहेण वच्चंति ।।795।।

4. तह परिमलिया गोवेण तेण हत्थं पि जा ण ओल्लेइ।
   सा च्चिअ धेणू एण्हिं पेच्छसु! कूड-दोहिणी जाआ ।।637।।

5. धवलो जिअइ तुह कए, धवलस्स कए जिअन्ति गिट्ठीओ।
जिअ तंबे! अम्ह वि जीविएण गोट्ठं तुमाअत्तं ।।638।।

6. एत्थ मए रमिअव्वं कुटुंब-समं चिंतिऊण हियएण।
पामर-कर-सेअ-उल्ला णिवअइ तुवरी ववज्जिन्ति ।।358।।

7. अप्पत्तं पत्तअं पाविऊण णव-रंगअं हलिअ-सोण्हा ।
उअह! तणुई ण माअइ रुंदासु वि गाम-रच्छासु ।।241।।

8. पेम्म-उम्मइयाइ मए उवऊढो हलिअ-पुत्त-बुद्धीए।
फंसेमि जाव, फरुसो तण-पुरिसो गाम-सीमाए ।।745।।

9. णव-कम्मिएण उअ-पामरेण दट्ठूण पाउ-हारीओ ।
मोत्तव्वे जोत्तअ-पग्गहम्मि अवहासिणी मुक्का ।।692।।

10. अलिहिज्जइ पंकअले हलालि-चलणेण कलम-गोवीए ।
केआर-सोअ-रूंभण-तंस-ट्ठिअ कोमल-चलणो ।।690।।

11. अंतोहुत्तं डज्झइ, जाआ-सुण्ण-घरे हलिय-पुत्तो ।
उक्खाअ-णिहाणाइं व्व रमिअ-ट्ठाणाइं पेच्छंतो ।।373।।

12. णिक्कम्माहिं वि छेत्ताहिं पामरो णेअ वच्चइ वसइं।
मअ-पिअ-जाआ-सुण्णइअ-गेह-दुक्खं परिहरन्तो ।।169।।

13. गहवइणा मुअ-सेरह-डुंडअ-दामं चिर वहेऊण।
वग्ग-सआइं णेऊण णवरिअ अज्जाघरे बद्धं।।172।।

14. सुह-पुच्छिआइ हलिओ मुह-पंकअ-सुरहि-पवण-णिव्वविअं।
तह पिअइ पअइ-कडुअं पि ओसहं जह ण णिट्ठाइ ।।317।।

15. किं रुअसि ओणअ-मुही धवलाअन्तेसु सालि-छित्तेसु।
हरिआल-मंडित-मुही णडि व्व सण-वाडिआ जाया ।।9।।

16. गाईउ पंच-खीरं भरिउ, चत्तारि पक्कल-बइल्ला ।
संपण्णं वालावल्ल-रअं, सेवा सिवं कुणउ ।।806।।

## शब्दार्थ

**पंक-मइलेण** – चिखलाने माखलेले.
**हलिओ** – शेतकऱ्यास.
**छीरेक्क-पाइण्ण** – चिखलाने माखलेले.
**सालि-छेत्तेण** – साळीचे शेत.
**जाणु** – गुडघा,
**आणंदिज्जइ** – आनंद देणे.
**वडणेण** – वाढलेले.
**फलही-वाहणं** – पेरणी करण्याचे साधन.
**लंगले** – नांगर.
**सईअ** – सती, पत्नी, स्त्री.
**गब्भिणीअ** – मनात. हृदयात असणे.
**कढिण** – कठीण.
**खरवीर** – खडबडीत.
**पेल्लण** – पेलने. सांभाळणे
**अग्गिकणे** – अग्निच्या ठिणग्या.
**धचले** – धैर्य नसलेले, दुबळे.
**पहे** – मार्ग.
**वच्चंति** – जाणे .
**परिमलिया** – हाताळणे, धार काढणे.
**गोवेण** – गवळ्याने.
**ओल्लेइ** – ओले होणे.
**एण्हिं** – आता.
**कूड** – कौशल्य, चातुर्य.
**दोहिणी** – द्रावविणे, हाताळणे, पाना घालणे.
**जाआ** – होणे, झाले, देणे.
**जिअइ** – जगते.
**कए** – करिता.
**तंबे** – तांबडी, तांबी.
**गोट्ठ** – गोठा.
**तुमाअत्तं** – आमच्यासाठी.
**मए** – मी.
**हिअएण** – मनात, मनाने.
**पामर** – गरीब शेतकरी.
**कर** – हात.
**सेय** – घाम.
**उल्ला** – ओले.
**णिवअइ** – पेरणे.
**वविज्जन्ति** – वाढल्यानंतर.
**अप्पत्तं** – न मिळणारे.
**पत्तअं** – मिळणे.
**सोण्हा** – सून.
**उअह** – पहा.
**तणुई** – कृश, सडपातळ.
**रच्छासु** – रस्त्यात.
**उम्मइयाए** – उन्माद, उत्कट, आतूर.
**उवऊढो** – वाढणे, निर्माण होणे.
**बुद्धीए** – विचाराने.
**फंसेमि** – स्पर्शाने.
**जाव** – जेव्हा.
**फरुसो** – कठीण.
**तणपुरिसो** – गवताने तयार केलेले बुजगावणे (पुरुष).
**कम्मिएण** – कर्म करणाऱ्याने.
**पामरेण** – गरीब, बिचाऱ्याने.
**उअ** – पहा.
**पाउ-हारीओ**– शिदोरी, भोजन, आणणाऱ्या पत्नीस.
**मोत्तव्वे** – सोडणे, मोकळे करणे.
**जोत्तअ** – जू.
**पग्गहम्मि** – घेणे, दोरी.
**अवहासिणी** – वेसण.
**मुक्का** – सोडणे, मुक्त करणे.
**आलिहज्जिइ** – लिहिलेले, ठसे, पाऊलखुणा.
**हलालि** – नांगरणे.
**कलम-गोवीए** – राखण करणारी स्त्री.
**केआर-सोआ**– जोराचा प्रवाह स्त्रोत.
**रुंभण** – अडथळा.
**तंस** – त्रस्त होणे, वक्र होणे.
**अंतोहुत्तं** – मनात.
**डज्झइ** – जळणे.

**जाआ** – पत्नी.
**उक्खाअ** – उखडून टाकणे.
**णिहाणाइं** – पुरलेली संपत्ती.
व्व– प्रमाणे, समान.
**णि–कम्माहिं** – काम नसतानाही.
**णेअ** – नसणे.
**मअ** – मरणे, मृत होणे.
**परिहरन्तो** – कमी होणे, नष्ट होणे.
**गहवइणा** – गृहपती, मालक.
**मुअ** – मृत, मेलेल्या.
**सेरह** – रेड्याचे.
**डुंडअ–दामं** – घुंगरांची माळ.
**चिर** – चिरकाळ.
**वहेऊण** – वाहून.
**वग्ग** – समूह.
**खीर** – दूध.
**पक्कल** – पक्व, प्रौढ, तरुण, पुष्ट.
**संपण्ण** – समृद्ध, सुपीक.
**इअ** – माती.
**सिवं** – आकर्षण
**पुच्छिआइ** – विचारपूस. चौकशी करण्यासाठी.
**पंकअ** – कमळ.
**सुरहि** – सुगंधित,
**पवण** – वाऱ्याने.
**णिव्वविअं** – थंड केलेले.
**पिअइ** – पिणे.
**पअइ** – स्वभाव, मुळातच.
**णिट्ठाइ** – न ठेवणे, संपविणे.
**ओणअ** – खाली.
**सण** – तागाचे.
**धवला–अन्तेसु** – पांढरे झालेले.
**मंडिय** – लावले, विभूषित झालेले.
**णडि**–नटी,
**वाडिआ** – वाढलेले.
**सआइं** – शेकडो.
**णेऊण** – नेऊन.
**णवरिअ** – योग्य न वाटल्याने.
**अज्जाघरे** – आर्याघर, देवतेच्या देवळात.
**बद्धं** – बांधणे.
**सुह** – सुखाची.

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) शेतकऱ्यास शेतातील पीक कोणाप्रमाणे वाटते?
2) बलवानांनी अवलंबलेल्या मार्गाचा कोणाला लाभ होतो?
3) गवळ्याच्या कौशल्याचा परिणाम कोणता होतो?
4) नवीन वस्त्र प्राप्त झालेल्या शेतकऱ्याच्या सुनेवर कोणता परिणाम झाला?
5) नववधूस पाहून गोंधळलेल्या शेतकऱ्याच्या मुलाने काय केले?
6) पत्नीच्या निधनाने, (दुःखाने) दग्ध झालेला शेतकरी आपले दुःख कसे कमी करतो?
7) प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आलेल्या शेजारच्या स्त्रीचा शेतकऱ्यावर कोणता परिणाम झाला?
8) सामान्य माणसांना कोणत्या गोष्टींचे आकर्षण असते?

## 2 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

1) पत्नीच्या निधनाने व्याकूळ झालेल्या शेतकऱ्याची अवस्था स्पष्ट करा.

2) शेतकऱ्याचे शेतावरील प्रेम स्पष्ट करा.

3) कुशल व बलवान शेतकऱ्याचे वर्णन करा.

## 3 खालील शब्दांना प्राकृतातील शब्द सांगा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1) | नांगर — | | 5) | शेतकरी — | |
| 2) | गवळी — | | 6) | आत — | |
| 3) | दूध — | | 7) | पत्नी — | |
| 4) | सून — | | | | |

## 4 रूपे ओळखा.

1) पेच्छंतो

2) ओसहं

3) पामरेण

4) वच्चइ

5) छेत्तेसु

## 5 वर्णबदल स्पष्ट करा.

1) छेत्त

2) गोव

3) अप्पत्त

4) कम्म

5) मुक्का

6) सुरहि